- 5 OCT 2023
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कविता जगण्याचे अवमूल्यन रोखते

## डॉ. राजन गवस : नारायण कुलकर्णी-कवठेकर यांना काळसेकर पुरस्कार प्रदान



शिवाजी विद्यापीठात बुधवारी ज्येष्ठ कवी नारायण कुलकर्णी-कवठेकर यांना सतीश काळसेकर काव्य पुरस्कार, तर प्रसिद्ध कवी वर्जेश सोळंकी यांना ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार डॉ. राजन गवस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ. रणधीर शिंदे, आदित्य काळसेकर, डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्रसिद्ध कवी वर्जेश सोळंकी, डॉ.नंदकुमार मोरे उपस्थित होते.

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : माणसाने कितीही प्रगती केली तरी त्याच्या सांस्कृतिक विकासासाठी कवितेची आवश्यकता असते. यंत्रे माणसाची किंमत कमी करतात, तर कविता जगण्याचे अवमूल्यन रोखते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात ज्येष्ठ कवी नारायण कुलकर्णी-कवठेकर यांना काव्यक्षेत्रातील मौलिक योगदानाबद्दल सतीश काळसेकर काव्य पुरस्कार, तर प्रसिद्ध कवी वर्जेश सोळंकी यांना आश्वासक कवितालेखनासाठीचा ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार डॉ. गवस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप अनुक्रमे २१ हजार रुपये व १० हजार रुपये आणि शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह असे आहे.

डॉ. गवस म्हणाले, कोणत्याही संस्कृतीचा विकास करण्यामध्ये कविता हातभार लावत असते. कवितेतील आवर्तने माणसाला जागे करून विचारप्रवण करतात. ही कवितेची ताकद आहे. अशा ताकदीने नारायण कुलकर्णी-कवठेकरांनी आपली कविता उभी केली. त्याचप्रमाणे वर्जेश ईश्वरलाल सोळंकी यांचीही आपल्या शब्दांवर प्रचंड हुकूमत असून, त्या बळावर त्यांची कविता सक्षम मानवतावादी रूप घेऊन अवतरते.

कुलगुरु डॉ. शिर्के, आदित्य काळसेकर यांनी मनोगत व्यक्त केले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक, डॉ. रणधीर शिंदे यांनी परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. राजेश पाटील यांनी आभार मानले.

- 5 OCT 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कविता जगण्याचे अवमूल्यन रोखते

## राजन गवस : काळसेकर पुरस्काराने नारायण कवठेकर, वर्जेश सोळंकी यांचा सन्मान

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ४ : 'माणसाने कितीही प्रगती केली, तरी त्याच्या सांस्कृतिक विकासासाठी कवितेची आवश्यकता असते. यंत्रे माणसाची किंमत कमी करतात, तर कविता जगण्याचे अवमूल्यन रोखते', असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सन २०२३ च्या सतीश काळसेकर व ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार प्रदान कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते. ज्येष्ठ कवी नारायण कुलकर्णी- कवठेकर यांना काव्य क्षेत्रातील मौलिक योगदानाबद्दल सतीश काळसेकर काव्य पुरस्कार, तर कवी वर्जेश सोळंकी यांना आश्वासक कविता लेखनासाठीचा ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार डॉ. गवस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. पुरस्काराचे स्वरुप अनुक्रमे २१ हजार रुपये आणि १० हजार रुपये आणि शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह असे आहे.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा सतीश काळसेकर काव्य पुरस्कार ज्येष्ठ कवी नारायण कुलकर्णी-कवठेकर यांना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी आज प्रदान केला. तर ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार कवी वर्जेश सोळंकी यांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी डावीकडून रणधीर शिंदे, आदित्य काळसेकर, विलास शिंदे, नंदकुमार मोरे उपस्थित होते.

डॉ. गवस म्हणाले, 'कवितेतील आवर्तने माणसाला जागे करून विचारप्रवण करतात. ही कवितेची ताकद आहे. अशा ताकदीने नारायण कुलकर्णी-कवठेकरांनी आपली कविता उभी केली आहे. त्यांच्या कवितेकडे जाण्याचे धाडस करणारे मराठी साहित्य वर्तुळात आज समीक्षक नाहीत. त्यांची कविता कोणत्याच पारंपरिक साच्यात बसत नाही. ती तडजोडवादी नाही. वर्जेश ईश्वरलाल सोळंकी यांची आपल्या शब्दांवर प्रचंड हुकूमत असून त्या बळावर त्यांची कविता एक सक्षम मानवतावादी रुप घेऊन आपल्यासमोर अवतरते.' कवी कवठेकर म्हणाले, 'कवितेमधून त्या त्या संस्कृतीची, जीवनाची ओळख होत असते. कवितेच्या माध्यमातून वास्तव सौम्य करीत जाणारा कवी अप्रामाणिक असतो.' कवी सोळंकी म्हणाले, 'सतीश काळसेकर हे मराठी साहित्यातील अभेद्य व अजातशत्रू व्यक्तिमत्व असून त्यांचे आपल्या जीवनात मोठे स्थान आहे.'

या कार्यक्रमात आदित्य काळसेकर यांनी मनोगत व्यक्त केले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी पुरस्कार विजेत्यांचा परिचय करून दिला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, महेश लीला पंडित, डॉ. प्रकाश पवार, अवनिश पाटील, उपस्थित होते. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. राजेश पाटील यांनी आभार मानले.

### कवितेला तेव्हा खरे पूर्णत्व

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'कवीला दिसणारे वास्तव तो शब्दरुपात वाचकांसमोर सादर करतो. मात्र, ती केवळ वाचून वाचकाची भूमिका संपत नाही, तर वाचकानेही सामाजिक दुःख, वेदना कमी करण्यासाठी पुढे सरसावले पाहिजे. कवितेला तेंव्हा खरे पूर्णत्व लाभते.'